cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३८ | शनिवार, दि.१३ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची गरज!

गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी एक परीक्षा महत्त्वाची नाही, तर प्रत्येक टप्पा अगदी अंगणवाडीपासून ते थेट उच्च शिक्षणापर्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे गुणवत्ता ढासळण्यासारखे आहे. अभियंते, डॉक्टर, वकील, कृषी क्षेत्रामध्ये विकास साधण्यासाठी तज्ज्ञ तयार होण्यासाठी कसदार शिक्षणाची गरज आहे. चाळणी परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची निवड होणे महत्त्वाचे आहे. आता नवीन नियम काढला आहे, तो म्हणजे आठवी पास की नापास हे न पाहता त्याला प्रमाणपत्र द्यायचे, परीक्षार्थींना पुस्तके उपलब्ध करून द्यायची, यामुळे अनेकांचा गोंधळ उडाला आहे. यामध्ये वेळीच बदल करण्याची गरज आहे.

### फटाके बंदी फक्त दिल्ली नाहीतर देशभरात हवी–सर्वोच्च न्यायालय

दिल्ली: शुक्रवार (१२ सप्टेंबर) रोजी सर्वोच्च न्यायालयाने निरिक्षण नोंदविले की, फटाक्यांवरील बंदी केवळ राष्ट्रीय राजधानी दिल्लीपुरती मर्यादित नसावी, तर देशभरातील लोकांना प्रदूषणमुक्त हवेचा अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी आर गवई पुढे म्हणाले की, म्हणून संपूर्ण देशासाठी एक धोरण तयार केले पाहिजे. जर फटाक्यांवर बंदी घालावी लागली तर ते संपूर्ण देशासाठी बनवले पाहिजे तसेच या उद्योगावर अवलंबून असलेल्या गरीबांचाही विचार केला पाहिजे, असे निरीक्षणही नोंदविले. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी आर गवई म्हणाले की, देशाच्या इतर भागात आणि शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना राष्ट्रीय राजधानी शहरातील ''उच्चभ्रू'' लोकांना हवा असलेला प्रदूषणापासूनचा दिलासा का दिला जाऊ नये असा सवालही यावेळी केला.

# उद्योगांच्या नावाखाली सुपीक जमिनी नासवल्या!

## शेतकरी संतापले, शासनाकडून दुर्लक्ष

रायगड । प्रतिनिधी

**शेतीपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी मेढेखार, कुसुंबळे परिसरातील हजारो एकर जमीन काही कंपन्यांनी खरेदी केली आहे; परंतु या ठिकाणी आजतागायत एकही प्रकल्प सुरू झाला नसल्याने खरेदी केलेल्या जमिनी परत कराव्यात, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. या प्रकाराने शेतकरी संतापले आहेत मात्र शासनाकडून याची कसलीच दखल घेतली जात नसल्याचे दिसत आहे.**

अलिबाग तालुक्यातील मेढेखार, कुसुंबळे, कातळपाडा, काचली, पिटकीरी, खातविरे गावातील ३८० शेतकऱ्यांच्या जमिनी मे. पटनी एनर्जी प्रा.लि., गायत्री लॅण्ड रिॲलिटी प्रा.लि., हिंगलज लॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., गणेश लॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., देवर्षी लॅण्ड प्रा.लि. यांसारख्या नऊ कंपन्यांनी शेतीविषयक व्यवसाय सुरू करण्यासाठी खरेदी केल्या. रोजगार मिळेल या आशेने शेतकऱ्यांनीही जमिनी विकण्यास तयारी दर्शवली; परंतु जमिनी खरेदी करून १५ वर्षांपेक्षा जास्त वर्ष होऊन कंपन्यांनी उद्योग सुरू केलेला नाही. या कंपन्यांनी जमिनीवर प्रकल्प उभारले नाहीत. शासनाच्या पाटबंधारे, खारलॅण्ड कार्यालयाने याकडे लक्ष दिले नाही. आता जमिनीच्या जागेत समुद्र वनस्पती, खारफुटींचे जंगल वाढलेले आहे. शेतजमिनी पूर्णपणे ओसाड आणि नापीक झाल्या आहेत.

▶▶ पान २ वर



## थोडक्यात...

### राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या या निर्णयाचे केले स्वागत

जुनागढः लोकसभेचे विरोधीपक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी हे सध्या गुजरातच्या दौऱ्यावर आहेत. गुजारतमधील जुनागढ येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एका निर्णयाचे कौतुक केले. जुनागढ येथील भेटीदरम्यान राहुल गांधी यांनी मणिपूर येथील हिंसाचार हा अनेक दिवसांपासून सुरू असल्यांचे सांगितले. त्यानंतर त्यांनी पंतप्रधान मणिपूरला जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले, मणिपूरचा विषय हा अनेक दिवसांपासून धुमसत आहे. आता पंतप्रधान तिकडे जात आहेत ही चांगली गोष्ट आहे. जरी नरेंद्र मोदींच्या या निर्णयाचे राहुल गांधी यांनी स्वागत केले असले तरी मत चोरीवरून चिमटा काढणे ते विसरले नाहीत.

### मुंबई हायकोर्टाला बॉम्बने उडवण्याची धमकी

दिल्लीः दिल्ली हायकोर्टापाठोपाठ मुंबई हायकोर्टाला शुक्रवारी (दि.१२) धमकीचा ईमेल मिळाला. या मेलमध्ये हायकोर्ट बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. या घटनांमुळे भितीचे वातावरण निर्माण झाले असून, हायकोर्टाच्या इमारती रिकाम्या करण्यात आल्या. पहिल्यांदा दिल्ली उच्च न्यायालयाला ई–मेलवरून बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. या धमकीमुळे खटल्याची सुनावणी करण्यासाठी बसलेल्या अनेक बेंचना स्थगिती देण्यात आली. तर काही खटल्याची सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. सध्या न्यायालयाच्या परिसरात शोध घेतला जात असून, अद्याप बॉम्ब असल्याची पुष्टी झालेली नसल्याचे दिल्ली पोलिसांनी म्हटले आहे.

### माधुरीला परत पाठवण्यावर निर्णय नाही

नवी दिल्ली : कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी इथल्या महादेवी उर्फ माधुरी हत्ती प्रकरणी शुक्रवारी (दि.१२) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परंतु, हत्तीणीला कोल्हापुरात परत पाठवण्यासंदर्भात तुर्त कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. हे प्रकरण उच्चस्तरीय कमिटीकडे पाठवण्यावर सर्वोच्च न्यायालयात एकमत झाले. राज्य सरकारच्या वकीलांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना म्हटले आहे की हा हत्ती कोल्हापूरवरून वनताराकडे पाठवला आहे. तो कोल्हापूरला परत पाठवावा, असा युक्तीवाद राज्य सरकारच्या वकीलांनी केला. यावर हत्तीची तब्बेत खूप खराब असल्याची कोर्टाने टिप्पणी करत आम्ही वनतारा बरोबर बोलू असे म्हटले.

### छत्तीसगडच्या बिजापूरमध्ये २ नक्षलवादी ठार

बिजापूर : छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात शुक्रवारी (१२ सप्टेंबर) झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी आणखी दोन नक्षलवाद्यांना ठार केले. यासोबतच, गेल्या २४ तासांत सुरक्षा दलांना मिळालेले हे दुसरे मोठे यश आहे. यापूर्वी, गुरुवारी गरियाबंद जिल्ह्यात १० नक्षलवादी मारले गेले होते. बिजापूर जिल्ह्यातील नैऋत्य भागात माओवाद्यांच्या हालचालीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली. या कारवाईदरम्यान, सकाळी सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये चकमक झाली. चकमकीच्या ठिकाणाहून आतापर्यंत २ माओवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले आहेत. तसेच, घटनास्थळावरून ३०३ रायफल आणि इतर शस्त्रे, स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. ऑपरेशन अजूनही सुरू आहे असून ते पूर्ण झाल्यानंतर अधिक माहिती समोर येईल.

# राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे आरक्षण जाहिर



**» मराठवाडा**

**छ. संभाजीनगर–सर्वसाधारण**
**जालना–नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)**
**बीड–अनुसूचित जाती (महिला)**
**हिंगोली –अनुसूचित जाती**
**नांदेड–नागरिकांचा मागास प्रवर्ग**
**धाराशिव–नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)**
**लातूर–सर्वसाधारण (महिला)**
**परभणी–अनुसूचित जाती**

**» संपूर्ण यादी:** ठाणे –सर्वसाधारण (महिला), पालघर अनुसुसूचित जमाती, रायगड–सर्वसाधारण, रत्नागिरी– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सिंधुदुर्ग सर्वसाधारण, नाशिक –सर्वसाधारण, धुळे –नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), नंदूरबार–अनुसूचित जमाती, जळगांव सर्वसाधारण, अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला) , पुणे –सर्वसाधारण, सातारा– नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), सांगली सर्वसाधारण (महिला), सोलापूर नागरिकांचा मागास प्रवर्ग, कोल्हापूर– सर्वसाधारण (महिला), अमरावती सर्वसाधारण (महिला), अकोला अनुसूचित जमाती (महिला), वाशिम अनुसूचित जमाती (महिला), बुलडाणा सर्वसाधारण, यवतमाळ सर्वसाधारण, नागपूर नागरिकांचा मागास प्रवर्ग, वर्धा– अनुसूचित जाती, भंडारा नागरिकांचा मागास प्रवर्ग, गोंदिया सर्वसाधारण (महिला), चंद्रपूर अनुसूचित जाती (महिला), गडचिरोली –सर्वसाधारण (महिला)

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या ग्रामकास विभागाने चक्रकार पद्धतीने सोडत काढत राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्ष–उपाध्यक्ष, विविध समित्यांचे सभापती आणि पंचायत समितीचे सभापती आणि उपसभापती पदासाठीच्या आरक्षणाची अधिसूचना शुक्रवारी जारी केली.**

मागील अनेक वर्षापासून जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणूका ओबीसी आरक्षणामुळे झाल्या नाहीत. त्यामुळे अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचा कारभार प्रशासकाच्या हाती होता. अखेर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जिल्हा परिषद, पंचायत समितींच्या निवडणूका आणि त्यावरील अध्यक्ष–उपाध्यक्ष, सभापती–उपसभापती यांच्या निवडणूका होणार आहेत. या पदासाठी अधिसूचनेतील माहितीनुसार सप्टेंबर २०२२ रोजी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या धोरणानुसार २०२५ च्या जिल्हा परिषद अध्यक्ष–उपाध्यक्ष आणि पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती पदासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. भंडारा

▶▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यातील राजकारणात उलथापालथ होण्याची शक्यता

### जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसुचित जाती महिलांसाठी राखीव, महिला राज येणार

बीडः राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण ग्रामविकास विभागाने जाहिर केले आहे, त्यानुसार बीड जिल्हापरिषदेचे अध्यक्षपद अनुसुचित जाती महिला प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आले आहे. या सुटलेल्या आरक्षणानुसार जिल्ह्यातील राजकारणात उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी जिल्हा परिषदेवर वर्चस्व मिळवण्यासाठी आता वेगवेगळे आराखडे बाधायला सुरूवात करतील. राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांसाठी आरक्षण सोडतीची अधिसूचना जाहिर करण्यात आली असून बीडचे अध्यक्षपद अनुसुचित जाती महिलांसाठी राहणार आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील कोणते गट अनुसुचित जाती महिलांसाठी राखीव राहतात त्याकडे लक्ष असणार आहे. दुसरीलकडे ६ पंचायत समित्यांच्या सभापती या महिला असणार आहेत. त्यानुसार १ अनुसूचित जाती महिला, २ ओबीसी महिला, तर ३ सर्वसाधारण महिला असणार आहेत. या मुळे या स्थानिक स्वराज्य संस्थावर महिला राज येणार हे स्पष्ट झाले आहे.

# ओबीसी मध्ये अतिक्रमण करू नका-छगन भुजबळ

## आरक्षणासाठी जीव दिलेल्या तरुणाच्या मुलीचे अश्रू पुसले



लातूर । प्रतिनिधी

मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेटनुसार आरक्षण मिळाल्याने ओबीसींचे आरक्षण आता संपले, अशी चिंता व्यक्त करत, घोषणा देत एका ओबीसी तरुणाने लातूरमध्ये आत्महत्या केली. मांजरा नदीपात्रात उडी घेत त्याने आत्महत्या केली. त्याने ओबीसीच्या आरक्षणाबाबत खदखद व्यक्त करणारी चिठ्ठी देखील लिहून ठेवली आहे. शुक्रवारी मंत्री छगन भुजबळ आ.धनंजय मुंडे आ. रमेश कराड यांनी त्याच्या कुटूंबियांची भेट घेऊन धीर दिला. ओबीसी मध्ये अतिक्रमण करू नका, अन्यथा आम्हाला तीव्र लढा उभा करावा लागेल, असा इशारा यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी दिला.

वांगदरी, ता. रेणापूर येथील भरत महादेव कराड (वय ३५) (रा. बांगदरी, ता. रेणापूर) हा ऑटो चालक होता आणि इतर वाहनांवर देखील चालक म्हणून काम करत होता. असे असताना तो गेल्या काही वर्षापासून ओबीसींच्या आरक्षणासाठीच्या प्रत्येक आंदोलनात सहभागी व्हायचा.

▶▶ पान २ वर

# मी हात जोडते, टोकाचे पाऊल उचलू नका–पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

समाज कोणताही असो,प्रश्न कितीही अवघड असो, ना उमेद होवून चालणार नाही.कोणतेही प्रश्न आत्महत्येने सुटत नाहीत. त्यामुळे कोणीही कच खाऊ नये. समोरच्या परिस्थितीशी तोंड देण्याची, संघर्षाची तयारी आपली असली पाहिजे. हक्कासाठी जरूर लढा, पण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल कोणीही उचलू नका असे कळकळीचे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सर्वच समाजातील तरूणांना केले आहे.



रेणापूर जि. लातूर तालुक्यातील वांगदरीच्या भरत कराड या युवकाने ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना काल घडली. या घटनेने ना. पंकजाताई मुंडे व्यथित झाल्या. या घटनेवर बोलतांना त्यांनी मन विषण्ण झाल्याचे सांगितले, त्या म्हणाल्या, या घटनेने सर्वांचाच जीव कालवला. अशाप्रकारे नैराश्यात जाऊन आपले जीवन संपविणे योग्य नाही. जीवनात आत्महत्या केल्याने सर्व प्रश्न सुटत नसतात. यासाठी संघर्षाची तयारी प्रत्येकाने ठेवली पाहिजे. अशा प्रकारच्या आत्महत्येच्या घटना मन पिळवटून टाकतात. आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या कुटुंबाचा, आपल्या स्वतःचा, लेकरा – बाळांचा निश्चित विचार प्रत्येकाने केला पाहिजे अशी एक नेता म्हणून नाही तर आईच्या ह्रदयातून आपली ही भावना असल्याचे पंकजाताई मुंडे


▶▶ पान २ वर

## सी.पी. राधाकृष्णन देशाचे १५ वे उपराष्ट्रपती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली शपथ

नवी दिल्ली । वृतसंस्था

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि देशाचे नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी (दि.१२) १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राधाकृष्णन यांना पदाची शपथ दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक ते उपराष्ट्रपती असा त्यांचा राजकीय प्रवास आतापर्यंत झाला आहे.

▶▶ पान २ वर



## ओबीसींचा मोर्चा राजधानी मुंबईत धडकणार

मुंबई । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ओबीसी समाजात अस्वस्थता आहे. मराठा आरक्षणाबाबतच्या जीआरवरून कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी सरकार रविरोधात दंड थोपटले असून, हा जीआर ओबीसींवर अन्याय करणारा असल्याचे म्हटले आहे. अशातच आता ओबीसी नेत्यांकडून आंदोलनासाठी मोर्चेबांधणी केली जात असून, ओबीसींचा मोर्चा लवकरच

▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षण; भुजबळ-मुंडे एकत्र!



### आता ॲक्शनला रिॲक्शन–हाके

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी राजकारण्यांवर चांगलीच आगपाखड केली. हैदराबाद गॅझेटवरून त्यांनी राजकीय पुढाऱ्यांना चांगलेच सुनावले. महाराष्ट्रामध्ये ॲक्शनला रिॲक्शन नक्कीच मिळेल, असा इशारा हाके यांनी दिला. त्याचवेळी ही रिॲक्शन लोकशाही मार्गाने असेल हे मी जबाबदारीने सांगतो असे आश्वासही त्यांनी दिले. आम्ही मोर्चे काढून आंदोलने करू, आम्ही महाराष्ट्रातल्या ओबीसीचा आवाज बुलंद करू. ओबीसी जर जागा झाला तर हे आमदार, खासदार, अर्थमंत्री, कारखानदार नेते राहणार नाहीत. २०२९ मध्ये फुले –शाहू –आंबेडकर विचारांचा खरा महाराष्ट्र जनतेला पाहायला मिळेल, असे ते म्हणाले.

मुंबई । प्रतिनिधी


ओबीसी आरक्षण संपले या भावनेतून लातूर जिल्ह्यातील एका ३५ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भरत महादेव कराड (३५) असे या तरुणाचे नाव आहे. तो लातूरच्या रेणापूर तालुक्यातील वांगदरी गावात राहत होता. या घटनेनंतर ओबीसी समाजामध्ये प्रचंड अस्वस्थता पाहायला मिळत आहे. या घटनेनंतर आता मंत्री छगन भुजबळ आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी एकत्र कराड कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कराड कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी धनंजय मुंडे यांनी कोणत्याही आरक्षणाला धक्का लागणार नाही. आत्महत्या करु नका, असे आवाहन सर्वांना केले.

▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638

cmyk

## अग्रलेख

# शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची गरज !

गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी एक परीक्षा महत्त्वाची नाही, तर प्रत्येक टप्पा अगदी अंगणवाडीपासून ते थेट उच्च शिक्षणापर्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे गुणवत्ता ढासळण्यासारखे आहे. अभियंते, डॉक्टर, वकील, कृषी क्षेत्रामध्ये विकास साधण्यासाठी तज्ज्ञ तयार होण्यासाठी कसदार शिक्षणाची गरज आहे. चाळणी परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची निवड होणे महत्त्वाचे आहे. आता नवीन नियम काढला आहे, तो म्हणजे आठवी पास की नापास हे न पाहता त्याला प्रमाणपत्र द्यायचे, परीक्षार्थींना पुस्तके उपलब्ध करून द्यायची, यामुळे अनेकांचा गोंधळ उडाला आहे. यामध्ये वेळीच बदल करण्याची गरज आहे.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी गॅट करारावर स्वाक्षरी केली आणि जगाची बाजारपेठ खुली झाली. मात्र, त्यानंतर पहिली ते आठवी परीक्षाच घ्यायची नाही, असा फतवा काढला गेला. जगाच्या स्पर्धेत उतरायचे असेल तर गुणवत्ता हवी आहे. गुणवत्ता सुधारण्याऐवजी कमी करण्याचा प्रयत्न केला जातोय, अशी मांडणी उच्च शिक्षितांनी केली. महाराष्ट्रात खराखुरा प्राथमिक शिक्षणाच्या सक्तीचा कायदा बहुजनांचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी ११ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पारित केला. तेव्हापासून शिक्षण प्रक्रियेच्या उन्नती करता प्रगती करिता वेगवेगळे शिक्षण आयोग स्थापित झाले. अगदी मुदलियार आयोग कोठारी आयोग यासारखे अनेक शिक्षण तज्ज्ञांच्या अध्यक्षतेखाली आयोगांची काम झाली. त्यामधून वेळोवेळी शिक्षणातील बदल करून विकासाकडे वाटचाल करण्याकरिता महाराष्ट्रात नेहमीच सकारात्मक पाऊल टाकले. मात्र, मागिल काही वर्षांमध्ये शिक्षण प्रक्रियेमध्ये नवनवीन बदल करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यातील एक प्रयत्न म्हणजे पहिली ते आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा न घेता पुढच्या वर्गात प्रवेश द्यावा, अशा पद्धतीच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली. तेव्हापासूनच्या भविष्यातील तीन-चार पिढ्या मागे पडल्या की पुढे गेल्या हा संशोधनाचा विषय आहे. परंतु खरंच एखादं काम वर्षभरापासून केलेले असते. परंतु, ते काम कितपत योग्य पद्धतीने झाले याचा पडताळा परीक्षेच्या माध्यमातून झाला पाहिजे. परंतु, तसं न करता सरळ प्रवेश घेतला की, तो आठवीपर्यंत कुठेही थांबणार नाही. मग त्याला लिहिता वाचता येतंय का त्याला तेवढ्या त्याच्या वयानुसार आकडेमोड भाषेची ओळख विज्ञान आणि तंत्रज्ञान याची ओळख झाली का, असे अनेक प्रश्न अनुत्तरीतच राहिले आहेत.

सध्या महाराष्ट्र शासनाने पहिली ते आठवी या वर्गाच्या अभ्यासक्रमपूर्तीनंतर घटक चाचणी, सहामाही, नऊमाही आणि वार्षिक अशा वेगवेगळ्या परीक्षांच्या माध्यमातून मूल्यमापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये कुठेतरी सकारात्मक बदल आपणाला दिसून येऊ लागले. पुन्हा मधल्या काळामध्ये परीक्षा बंद केल्या होत्या त्यावेळेस विद्यार्थ्यांची गुणवत्ता घसरली. अनेक संशोधन त्यावर झाली, अनेक बातम्या ऐकल्या वाचल्या, तीच मुलं अकरावी-बारावी ग्रॅज्युएशनकडे शिक्षणाकरिता गेली. त्यावेळी मात्र, त्यातील अनेक विद्यार्थ्यांची गळती झाल्याचे चित्र दिसून आलं. हा सगळा विचार करून शासनाने या विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुन्हा सुरू केल्या, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. पालकांमध्ये जागृती झाल्याचं चित्र त्याठिकाणी स्पष्टपणे दिसतंय पूर्वी विद्यार्थी शाळेमध्ये गेला काय, शिकला काय, शिकवलं काय, काय आत्मसात झालं. हे सगळं पालकांना जागृतीनं पाहावं लागायचं. आत्ता परीक्षा सुरू केल्यामुळे मुळातच विद्यार्थ्यांना नियमित शाळेमध्ये उपस्थित राहून अभ्यास करावा लागत आहे. विद्यार्थीच स्वतः हे काम चांगल्या रीतीने करत असल्याने पालकही समाधानी असल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना समुपदेशनाच्या माध्यमातून एज्युकेशनल टेक्नॉलॉजीचा वापर करून ज्ञानदान करण्याचं काम शाळांमधून शिक्षक करताना दिसत आहेत. भविष्यातला आधुनिक काळातील टेक्नॉलॉजी बेस विद्यार्थी बनला पाहिजे. तो जिज्ञासू वृत्तीने त्याने शैक्षणिक कामकाजात सहभाग घेतला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अशा पद्धतीचा निर्णय घेतला असणार आहे. कोणत्याही इयत्तेच्या परीक्षा घ्याव्यात प्रॅक्टिकल घ्यावं तोंडी परीक्षा घ्याव्यात आणि त्यांच्याशी सुसंवादही साधला पाहिजे. या सर्व गोष्टीमुळे नक्कीच विद्यार्थी कार्यक्षम कार्यतत्पर आणि भविष्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणारा बनेल, हे सुधारणेचे आणि गुणवत्तेचे पाऊल असणार आहे.

जिल्हा परिषद, महापालिकांच्या शाळांमध्ये गुणवत्तावाढ प्रकल्प राबविले जात आहेत. शाळांना मदत करण्यासाठी अनेक संस्था संघटना पुढे येत आहेत. मात्र, परीक्षाच घेणार नसाल, तर त्यांची गुणवत्ता कशी सुधारणार असा प्रश्न आहे. आठवीपर्यंत सरळ पुढच्या वर्गात ढकलायचा प्रयत्न योग्य की अयोग्य असा प्रश्न पडतो. पुढे दहावी-बारावी आणि स्पर्धा परीक्षांमध्ये निकष लावायचे हे योग्य आहे का, त्या परीक्षांमध्ये सरळ वरच्या वर्गात ढकललेले विद्यार्थी कसे टिकणार असा प्रश्न आहे. राज्यातील परीक्षा विभागाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# मानसिक तानतणाव कसा रोखाता येईल-डॉ.जगदीश टेकाळे

मित्रांनो, हल्लीचे जग खूप धावपळीचे झालेले आहे. आपण सगळे फक्त घड्याळाच्या काट्यावर धावतो. या धावपळीत आपल्याला स्वतःसाठी वेळच नाही. परिणामी मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. हा मानसिक तणाव नकळतपणे आपली लक्षणे दाखवू लागतो.

सुरुवातीला आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि तसेच दुखणे अंगावरत काढतो. परंतु हाच साधासुधा वाटणारा ताणतणाव नंतर मात्र हळूहळू नैराश्याच्या स्वरूपात आपले भयानक स्वरूप दाखवू लागतो. हे सर्व वेळीच रोखण्यासाठी दिसत असणारी सर्व लक्षणे नीट अभ्यासणे गरजेचे आहे. तरच या सगळ्याचा यशस्वीरीत्या सामना करून तणावाला मात देता येईल. काय आहेत मानसिक तणावाची शारीरिक लक्षणे? तोंडाला चव न लागणे. भूक न लागणे. विनाकारण मळमळ, उलटी आल्याची भावना होणे. डोके गरगरल्यासारखे वाटणे, चालताना हलकासा तोल गेल्यासारखे वाटणे, डोके सुन्न होणे. झोप न लागणे आणि झोप लागली तरी सतत झोपमोड होणे. हातपाय थरथरणे. पोटात अचानक कळ/ गोळा येणे, मलावरोध होणे. वारंवार लघवीला आल्यासारखे वाटणे. त्वचा रुक्ष आणि कोरडी होणे. अंगाला खाज सुटणे. चेहरा निस्तेज होणे, डोळ्याखाली काळी वर्तुळे येणे. केस गळणे. अचानक वजन वाढणे किंवा कमी होणे. अचानक डोळ्यावर अंधारी येणे, डोळे कोरडे होणे. सतत तोंड येणे. मानसिक लक्षणे... विनाकारण अस्वस्थ वाटणे. अनामिक भीती वाटणे. काहीही करावेसे न वाटणे. नुसतेच झोपून राहावे, एकाजागी बसून राहावे असे वाटणे. भीती वाटून अंगाला सतत घाम सुटणे. घशाला कोरड पडणे. साध्यासुध्या गोष्टी लक्षात न राहणे. एखादी गोष्ट आठवण्यासाठी मेंदूला खूप ताण द्यावा लागणे. भावना अनावर होऊन अचानक रडू येणे, सतत दुःखी राहणे, शून्यात नजर लावून बसणे. चित्रविचित्र आणि वाईट स्वप्ने पडणे. काळवेळेचे भान न राहणे. धाप लागल्यासारखे होणे, हृदयात धडधडल्या सारखे होणे, कानातून आवाज येणे. प्रचंड थकवा आल्यासारखे वाटणे. सगळे अंग आखडून गेल्याची भावना होणे त्यामुळे काहीच हालचाल करावीशी न वाटणे. चित्रविचित्र आवाज ऐकू येणे, भास होणे. हातापायात मुंग्या येणे.



हे सर्व कसे रोखता येईल. स्वतःचे दैनंदिन जीवन एका निश्चित वेळापत्रकात आखून घेऊन त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न करावा. जगातील सगळी दुःखे, संकटे देवाने मलाच दिली आहेत, ही भावना सर्वप्रथम मनातून काढून टाकावी. जगातील सगळ्या गोष्टी मला जमायलाच हव्यात हा अट्टहास सोडून द्यावा. ईर्ष्या, राग, स्पर्धा, चिडचिड यापासून शक्य तितके दूर रहावे. स्वतःला ज्या गोष्टी चांगल्याप्रकारे करता येतात त्यात प्रगती करावी. मन शांत, प्रसन्न आणि खंबीर ठेवावे. शारीरिक व्यायाम उदा - योगासने, सूर्यनमस्कार, चालणें, धावणे, पोहणे, मैदानी खेळ यासारख्या गोष्टी नित्यनेमाने कराव्यात. मानसिक व्यायाम उदा.- ध्यानधारणा, प्राणायम, एखादी कला (उदा.- चित्रे, रांगोळ्या काढणे, विणकाम करणे, बागकाम करणे, वाचन) यादेखील गोष्टी नित्यनेमाने कराव्यात. स्वतःच्या मनाला ''सकारात्मक स्वयंसूचना'' द्याव्यात. पुरेशी झोप घ्यावी. जागरण कटाक्षाने टाळावे. सकस व संतुलित आहार घ्यावा. वेळेचे नियोजन करून स्वतःसाठी देखील वेळ राखून ठेवावा व त्याचा सदुपयोग करावा. अतिचिंता करणे प्रकर्षाने टाळावे. ज्या त्या गोष्टी जशा आहेत तशा स्वरूपात स्वीकारून त्यात आनंद निर्माण करावा. कुठल्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहावे. स्वतःचे कुटुंब, मित्रमैत्रिणी यासोबत वेळ घालवावा. आपण स्वतः एकटे पडणार नाही याची काळजी घ्यावी. स्वतःच्या डोक्यात येणारे वाईट विचार, भिती वेळीच बोलून दाखवावी जेणेकरून ते विचार तिथेच नष्ट होतील व संभाव्य ताणतणाव आणि नैराश्य टाळता येईल. स्वतःमध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ देऊ नये. आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. मित्रांनो, सदर पोस्ट ही केवळ माहितीसाठी आहे. नैराश्य (डिप्रेशन) हा आजार पूर्णपणे वैद्यकीय उपचार घेतल्यानेच बरा होतो आणि त्यासाठी वेळीच डॉक्टरांची मदत ही घ्यावीच लागते असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान ६ वरून...

### डॉ.सुधीर तांबे व आ.सत्यजीत

होऊन युवकांशी संवाद साधणार आहेत. शिबिरादरम्यान युवकांच्या भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणारे विविध विषय हाताळले जाणार आहेत. त्यात युवा सशक्तीकरण, महिला व युवक नेतृत्व विकास, सामाजिक समता व न्याय यांचा विशेष समावेश आहे. या व्यतिरिक्त युवकांना समाजातील बदलत्या परिस्थितीबाबत जागरूक करण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी दृढ करण्यासाठी ''मित्र सुदृढ समाज व्यवस्थेचा दुवा'' या विषयावर आधारित पथनाट्याचे सादरीकरण होणार असून ते उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. या शिबिराचा समारोप २० सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते दुपारी २ या वेळेत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे होणार आहे. समारोप सोहळ्यास नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार आ. सत्यजीत दादा तांबे हे प्रमुख उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या समारोप सत्रात युवकांना नवीन दृष्टीकोन, सामाजिक बांधिलकी व राजकीय भान यांची प्रेरणा मिळणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या संपूर्ण शिबिराचे आयोजन जयहिंद लोकचळवळ, मराठवाडा विभाग यांनी केले असून संयोजक म्हणून प्रदेश कार्यकारणी सदस्य रमेश महादेव सानप व जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण नाईकवडे यांच्यासह स्थानिक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. युवकांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी व्हावे, सामाजिक परिवर्तनासाठी सज्ज व्हावे आणि नवीन उर्जा घेऊन समाजकार्यात उतरावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

-----------

### जिल्ह्यात सर्वांनी सामाजिक

शिक्षणाला महत्त्व देण्याचे आवाहन याप्रसंगी सर्व सहकार्यांना केले. तर मुफ्ती अशफाक साहब यांनी मोहंमद पैगम्बर यांच्या बद्दल माहिती देऊन परळी अंबाजोगाईची ओळख सांगून जिल्ह्यात सामाजिक सलोखा सर्वांनी टिकवणे गरजेचे असल्याचे यावेळी नमूद केले. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी गवळीपुरा मित्रमंडळाचे ते राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले. अशा प्रकारचा समाजोपयोगी कार्यक्रम आज ते सलग अठरा वर्ष पूर्ण करत असून हा उपक्रम सतत ५० ते ६० वर्ष चालावा अश्या शुभेच्छा त्यांनी दिल्या तसेच ॲड इस्माईल गवळी, मुजीब काजी सर, डॉ राजेश इंगोले, पत्रकार दत्तात्रय आंबेकर, महादेव आदमाने यांनी देखील आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी गवळीपुरा मित्रमंडळाच्या वतीने प्रथमच यावर्षी समाजसेवा पुरस्कार सुरु करण्यात आला हा पुरस्कार उपस्थित मान्यवराच्या हस्ते शेख मुक्तार चाचू यांना प्रदान करण्यात आला. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मित्रमंडळाचे अध्यक्ष जावेद छोटू गवळी, खलील जाफरी,रहीम गवळी रमजान नोरंगाबादे, अमजद गवळी, महेबूब गवली, रमजान गवळी, कैलास कांबळे,अक्रम गवळी, शकेर काझी, सत्तार गवळी, अकबर पपुवाले, जावेद फुलारी, फेरोज रेघीवाले,हाजी जावेद गवळी, जमीलभाई पिजारी, शे हद्दी,जुम्मा गवळी,अक्रम अली अन्वर अली शे फेरोज शे मसूद, शे जलील अमजत अली,शे सलीम चौधरी,आदिनी परिश्रम घेतले . कार्यकमाचे प्रस्ताविक जावेद छोटू गवळी यांनी सूत्रसंचालन विजय राप्तवार सर तसेच आभार प्रदर्शन हुसेन लाला चौधरी यांनी केले.

-----------

### डिजिटल मिडिया परिषदेच्या

राहणार आहेत.''मुक्तपीठ'' चे संपादक आणि नवा काळचे सल्लागार संपादक तुळशीदास भोईटे आणि ''अभिव्यक्ती'' युट्यूब चँनलचे संपादक रवींद्र पोखरकर मुख्य वक्ते म्हणून उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करणार आहेत.. डिजिटल आणि प्रिन्ट मिडियातील पत्रकारांनी अधिवेशनास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहन परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, कार्यक्रमाचे संयोजक तथा संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे.अधिवेशनात उत्कृष्ट युट्यूब चँनल चालवून ते यशस्वी करून दाखविणारया काही संपादकांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती अनिल वाघमारे यांनी दिली.अधिवेशनास स्थानिक निवृत्त मान्यवर पत्रकारांचा ही सन्मान करण्यात येणार आहे.. तसेच डिजिटल मिडिया परिषदेची राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे.डिजिटल मिडिया परिषदेचे हे अधिवेशन ऐतिहासिक ठरेल असा विश्वास एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केला आहे..

------

## पान १ वरून...

### उद्योगांच्या नावाखाली

या भांडवलदार कंपन्यांमुळे जमिनींची दुर्दशा झाली आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांविरोधात शासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

---------

### राज्यातील जिल्हा परिषद,

आणि गोंदिया या जिल्हा परिषदा करिता सध्या लागू असलेल्या आरक्षण कालवधीच्या समाप्तीनंतर लगेच हे नवे आरक्षण लागू होणार आहे. तसेच जि.प अध्यक्ष आणि उपाध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती उपसभापती पदावर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. तसेच हे प्रत्येक पद अडीच वर्षांसाठी राखीव राहणार आहे. जाहीर यादीनुसार, ठाणे, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ यांसह नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग खुला ठेवण्यात आला आहे. यामध्ये ठाणे, सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली यांसारख्या जिल्ह्यांत सर्वसाधारण (महिला) आरक्षण लागू करण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी बीड (महिला), हिंगोली, परभणी, वर्धा आणि चंद्रपूर (महिला) ही पदे आरक्षित करण्यात आली आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी पालघर, नंदुरबार, अहिल्यानगर (महिला), अकोला (महिला) आणि वाशिम (महिला) या जिल्ह्यांतील अध्यक्षपदे राखीव ठेवली गेली आहेत. इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी रत्नागिरी (महिला), धुळे (महिला), सातारा (महिला), सोलापूर, जालना (महिला), नांदेड, धाराशिव (महिला), नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या आरक्षण घोषणेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांतील राजकीय गणिते ठरविण्यात महत्त्वाचा बदल होणार आहे. पक्षीय स्तरावर उमेदवार ठरविताना या आरक्षणाचा विचार करावा लागणार असून, महिला आरक्षणामुळे अनेक जिल्ह्यांत नवीन नेतृत्वाला संधी मिळणार आहे.

-----------

### मी हात जोडते, टोकाचे

यांनी म्हटले आहे. सामाजिक लढाया लढल्या जातील, कुणी जिंकेल, हरेल, त्यात कुणी राजकारण करेल, कुणी फायदा घेईल, कुणी गैरफायदा घेईल, कुणी समर्पित होऊन काम करेल पण हया सर्वामध्ये स्वतःचे मन स्वतःच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. कुणासमोर कधी झुकायचे नाही, लोकनेते मुंडे साहेब संघर्षाला धैर्याने सामोरे गेले, त्यांचे संस्कार आपल्यावर आहेत असे त्या म्हणाल्या.

**ना उमेद होवू नका**

वारंवार नैराश्यातून आत्महत्या घडतांना आज दिसतात.समाज कोणताही असो अथवा शेतकरी असो कोणीही आत्महत्येचा विचार डोक्यात आणला नाही पाहिजे असेच वाटते. मात्र तरीही अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना समोर येतात. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मातील,समाज बांधव व सर्व स्तरातील नागरिक, कोणीही कच खाऊ नये, संघर्षाला तोंड देण्याची तयारी ठेवून लढण्याचा बाणा जपला पाहिजे. त्यामुळे कोणीही आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी सर्वांना केले आहे.

-----------------

### ओबीसी मध्ये अतिक्रमण करू

या तरुणाने बुधवारी सायंकाळी वांगदरी शिवारात मांजरा नदीपात्रात उडी घेऊन आत्महत्या केली. हैदराबाद गॅझेट मराठा समाजाला लागू केले, आता त्यांना ओबीसीचे प्रमाणपत्र मिळणार, आपलं ओबीसीचं आरक्षण संपणार या भीतीपोटी त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. त्याच्या जाण्याने कुटुंबासोबतच गावातील ओबीसी समाजामध्ये शोककळा पसरली आहे. यातच मंत्री छगन भुजबळ आणि माजी मंत्री धनंजय मुंडेंनी कराड यांच्या घरी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी छगन भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, महाराष्ट्रातील ओबीसींना मंडल आयोगापासून आरक्षण मिळालं आहे. तेही आता १७ टक्केच शिल्लक राहिलं आहे. आमचा ओबीसी आरक्षण टिकविण्यासाठीचा लढा आहे. आता अतिक्रमण करू नका, आमचं आरक्षण हिरावून घेऊ नका, अन्यथा आम्ही आरक्षणाचा तिव्र लढा देऊ. छगन भुजबळ यांनी ५२ टक्क्याने असलेल्या ओबीसीला आता केवळ १७ टक्के आरक्षण शिल्लक राहिले आहे. यात पुन्हा बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षण दिले तर मूळ ओबीसींवर मोठा अन्याय होणार आहे. त्यास आम्ही तीव्र विरोध करू, कोणत्याही परिस्थितीमध्ये मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण देण्यास आमचा विरोध आहे. आम्ही ते होऊ देणार नाही, त्यासाठी ओबीसींनी आपआपले सर्व मतभेद बाजूला सारून एकजूट करावी, असे आवाहन भुजबळ यांनी केले.

**भुजबळांनी कराडांच्या मुलीचे अश्रू पुसले**

कराड यांचे वांगदरीत अत्यंत साधे घर होते. तिथे कराड यांची आई, पत्नी, तीन मुली, एक मुलगा व इतर नातेवाईक बसलेले होते. त्यांच्यासमोरच मांडी घालून भुजबळ, धनंजय मुंडे, आ. कराड बसले. छगन भुजबळ यांनी भरत कराड याच्या एका मुलीस मायेने जवळ घेत कवटाळले, मांडीवर बसविले. ती मुलगी रडत असताना आपल्या खिशातून हातरूमाल काढून भुजबळांनी त्या मुलीचे आश्रू पुसले. इतर मुलांच्या डोक्यावरून हात फिरविला, भरत कराड याच्या मुलांची आपण जबाबदारी घेत आहोत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

--------

### ओबीसींचा मोर्चा राजधानी

मुंबईत धडकण्याची शक्यता आहे. सरकारने काढलेल्या जीआरमुळे मराठा समाजातील अनेक व्यक्तींना कुणबी दाखले मिळून त्यांचे ओबीसीकरण होण्याची भीती ओबीसीतील इतर जातींना आहे. या पार्श्वभूमीवर सरकार दरबारी आपला रोष व्यक्त करण्यासाठी आम्हीही मुंबईत लाखोंच्या संख्येने धडक देऊ, असे ओबीसी नेत्यांकडून सांगितले जात आहे. साधारणमोर्चाचे आयोजन केले जाणार असल्याचे समजते. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी लाखो आंदोलकांसह मुंबईत उपोषण करत सरकारला झुकण्यास भाग पाडले आणि आपल्या मागण्या मान्य केल्या. मात्र या शासन निर्णयामुळे अस्वस्थ झालेल्या ओबीसींकडूनही मुंबईत मोर्चाचं आयोजन केले जाणार असल्याने सरकारची कोंडी होण्याची शक्यता आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी हैदराबाद गॅझेटबाबतच्या 'जीआर'वर आक्षेप घेऊन न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. आरक्षणासाठी सरकावर दबाव टाकला जात आहे. कोणी म्हणत असेल, पुन्हा रस्त्यावर उतरू, तर ओबीसी समाजही ग्रामीण पातळीवर मोर्चे काढत आहेत. तेही एकत्र येऊन प्रत्युत्तर देऊ शकतात, असे म्हणत भुजबळांनी मोर्चाचे संकेत दिले. 'या देशात अद्याप लोकशाही असून, अजून जरांगेशाही यायची आहे. आपल्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान आहे. त्यामुळे इथे जरांगेशाही येणार नाही,' असे म्हणत भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावरही निशाणा साधला. सरकारने काढलेल्या 'जीआर'बाबत आक्षेप मांडताना छगन भुजबळ म्हणाले, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हेतू चांगला असेल, त्यांचा अभ्यास आहे; पण ज्या पद्धतीने मसुदा तयार झाला आहे, त्या बाबतीत आम्ही अभ्यासकांशी बोललो आहोत. ते म्हणाले, हे अडचणीचे झाले आहे. पहिल्या 'जीआर'मध्ये मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र द्या, असा उल्लेख होता. मनोज जरांगे यांनी एका तासात राज्य सरकारला तो शब्द बदलायला भाग पाडले,' असा दावा भुजबळांनी केला.

----------

### सी.पी. राधाकृष्णन देशाचे १५ वे उपराष्ट्रपती

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार तथा महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन ४५२ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी विरोधी इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांचा दणदणीत पराभव केला. रेड्डी यांना ३०० मते मिळाली. विशेष म्हणजे, एनडीएमध्ये नसलेल्या १४ खासदारांनी राधाकृष्णन यांना मतदान केल्याचे समोर आल्यामुळे विरोधकांची मते फुटल्याचे स्पष्ट झाले. शुक्रवारी सी.पी. राधाकृष्णन यांनी देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. सी. पी. राधाकृष्णन हे चार दशकांपासून तामिळनाडूसह देशाच्या विविध भागांत राजकारण, तसेच सार्वजनिक जीवनातील एक परिचित व्यक्तिमत्त्व राहिले आहेत. वयाच्या १६ व्या वर्षी सी. पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून जीवनाची सुरुवात केली.

-------------

### ओबीसी आरक्षण;

यावेळी आरक्षणाच्या मुद्यावर भुजबळ - मुंडे एकत्र आले असल्याचे दिसून आले. धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आत्महत्या केलेल्या भरत कराड यांच्याबद्दल भाष्य केले. माझी हात जोडून विनंती आहे की ज्यांना आरक्षणाचा फायदा होणार आहे, तेच जर अशाप्रकारे आत्महत्या करु लागले, मग हे आरक्षण द्यायचे कोणाला. त्यामुळे कोणीही अतातायीपणा करु नका. सरकार अतिशय सजग आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले. आरक्षण वाचावे म्हणून एकाने आपल्या जीवनाची अहुती दिली आहे. ती अहुती देताना त्याला तीन मुली, एक मुलगा, बायको घरदार काहीही दिसले नाही. ही तीव्रता महाराष्ट्रात आपण पाहतोय. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी कुठल्याही आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची खात्री घेतलेली आहे, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले. या सर्व गोष्टी पाहत असताना आता दोन जातीचे मित्र एकमेकांच्या जीवावर उठत आहेत. काही जिल्ह्यात तर पोलिसांना ड्रेसकोडवर आडनाव लावायची बंदी आहे. हे छत्रपती शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राला शोभणारे नाही. त्यामुळे आता आपल्याला सर्वांना प्रयत्न करुन ती समता प्रस्थापित करावी लागेल. मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी आरक्षणाला धक्का लागणार नाही याची काळजी घेतली आहे. कोणत्याही आरक्षणाला धक्का लागणार नाही. आत्महत्या करु नका, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी यावेळी केले.

---------


### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि

दिनांक ०९-०९-२५

कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार सुशिला अर्जूनराव वाघमारे रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे अर्जून उत्तमराव वाघमारे रा.परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(शपथपत्र) दि.०९/०९/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.दि.०९/०९/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.() ज्याचा मिळकत क्रमांक (१८४१/३) चे भुखंड क्रमांक ( ) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व-उद्धव वाघमारे

पश्चिम-नारायण ढोबाडे

दक्षिण-गंज शाळा

उत्तर-४ फुट बोळ

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ( 10X7 व 22X22 ) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

मुख्याधिकारी
स्वाक्षरी/-
नगर परिषद परतुर

### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि

दिनांक २८-०८-२५

कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार शकुंतलाबाई गजानन सरकटे रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे सुमनबाई आसाराम सवने रा.परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(१०८०) दि.२३/०६/२०२० सत्यप्रत जोडून आवक क्र.१४७१ दि.२५/०८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(३०१/२४०) ज्याचा मिळकत क्रमांक (९४२/१व ९४३/१) चे भुखंड क्रमांक ( ) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व-मारोती खरवडे व दिगांबर खरवडे यांची

पश्चिम-जिजाबाई खालापुरे यांनी आज खरेदी

दक्षिण-दिलावर खॉ यांची मालमत्ता

उत्तर-रस्ता

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ( 40X25 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

मुख्याधिकारी
स्वाक्षरी/-
नगर परिषद परतुर

### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि

दिनांक ०९-०९-२५

कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार उमाशंकर धोंडीराम दवंडे रा.येणोरा ता.परतुर जि.जालना यांनी नामे इम्राण अहेमद नसीर अहेमद रा.परभणी रा.परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२६३१) दि.०२/०९/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र. दि.०९/०९/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती इम्राण अहेमद रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(२४२/२) ज्याचा मिळकत क्रमांक (४६०३) चे भुखंड क्रमांक (६) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व-९ मिटर रस्ता

पश्चिम-६ मिटर रस्ता

दक्षिण-राठोड यांची मालमत्ता

उत्तर-छबानी यांची जिनिंग

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र ( ) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

मुख्याधिकारी
स्वाक्षरी/-
नगर परिषद परतुर

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५



## डिजिटल मीडिया राज्य अधिवेशनाला उपस्थित रहा

### तौर,आजबे,ननवरे,जोशी,कदम,सोनवणे,यादव,अरकडे,लाटकर यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष मधुकर तौर-गेवराई ,दत्ता आजबे-बीड ,जालींदर ननवरे-शिरूर कासार,अजय जोशी-पाटोदा,अविनाश कदम, -आष्टी,हरीष यादव -माजलगाव ,सतिष सोनवने,विजय अरकडे -केज,राजविर लाटकर यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे तालुकाध्यक्ष मधुकर तौर-गेवराई, दत्ता आजबे-बीड,जालींदर ननवरे-शिरुर, अजय जोशी - पाटोदा अविनाश कदम-आष्टी,विजय अरकडे-केज,राजविर लाटकर-अंबाजोगाई,हरीष यादव-माजलगाव,सतिष सोनवने-वडवनी यांनी केले आहे.

## पाटोद्यात रस्त्यांची दयनीय अवस्था पाच वर्षे पूर्ण होण्याआधीच विकासाचा बुरखा फाटला!

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोद्यात रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली असून, लाखो रुपयांचा निधी खर्च करून करण्यात आलेले रस्ते पाच वर्षे पूर्ण होण्याआधीच उध्वस्त होत आहेत. काही भागात धुळीचे साम्राज्य तर काही भागात खड्ड्यांचे जाळे दिसून येत असल्याने सर्वसामान्य नागरिकांचा संताप उसळला आहे.**

सत्ताधारी व प्रशासनाने ''गुणवत्तापूर्ण विकासकामे'' केल्याचे कितीही दावे केले तरी प्रत्यक्षात परिस्थिती याउलट आहे. रस्त्यांच्या नावाखाली केवळ जनतेच्या पैशांची लूट झाली असून, पाटोद्यातील रस्त्यांची अवस्था पाहता हे सर्व चित्र स्पष्ट होत आहे.एवढ्या कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून असे निकृष्ट दर्जाचे रस्ते का झाले? काम सुरु करताना अधिकारी, अभियंते, जनप्रतिनिधी यांनी दर्जा का पाहिला नाही? पाच वर्षे टिकाव धरू न शकणारे रस्ते म्हणजे भ्रष्टाचाराचे थेट उदाहरण नाही का? पावसाळ्यात खड्ड्यांनी रस्त्यांचा चक्काचूर केला आहे. अनेक ठिकाणी रस्ते ओळखूही येत नाहीत. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे हाल तर होत आसून यावरून दिसते जनतेच्या पैशावर सरळसरळ डल्ला मारण्यात आला आहे. पाटोद्यातील रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत नागरिक आता सोशल मिडियावरही संताप व्यक्त करत आहेत. यामुळे जबाबदार कंत्राटदारांवर व त्यांना काम मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे. विकासाच्या नावाखाली केवळ भ्रष्टाचार आणि निधीचा अपव्यय होत असल्याने सर्वसामान्य जनता फसली असल्याची भावना निर्माण झाली आहे.आता तरी नागरिकांनी जागे होऊन दर्जाहीन रस्त्यांची चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा पाटोद्यातील नागरिकांना दरवर्षी अशाच खड्ड्यांमध्ये आपले भविष्य शोधावे लागणार आहे.

## मैदानी स्पर्धेत खोलेश्वर महाविद्यालयाचे घवघवीत यश




अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळविले. दिनांक २ सप्टेंबर ते सहा सप्टेंबर २०२५ या दरम्यान ही मैदानी स्पर्धा बालेवाडी पुणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेत कु.साक्षी थाटकर अर्जुन बालगुडे कु.राजनंदिनी केंद्रे ओमकार पवार यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमधून कु.साक्षी थाटकर व ओमकार पवार यांची राष्ट्रीय स्पध साठी निवड झाली.**

बंजारा समाजाला हैद्राबाद गॅझेटियरनुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या लेखी पत्रात पुढे म्हटले आहे की, इ.स. १९४८ पर्यंत मराठवाडा निजामशाहीत हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या काळातील हैद्राबाद गॅझेटियरमध्ये बंजारा समाजाचा स्पष्ट उल्लेख अनुसूचित जमाती म्हणुन केलेला आहे. बंजारा (लमाण) हा समाज मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असल्यामुळे हैद्राबाद गॅझेटियर लागू करून बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा अशी मागणी माजी आमदार श्री. चव्हाण यांनी केली आहे.

# गजानन अर्बन बँकेतून भर दिवसा पाच लाखाची बॅग लंपास

## पोलिसांना रिकामी बॅग सापडली

जालना । प्रतिनिधी

जाफराबाद शहरात गुरूवारी भर दिवसा जाफराबाद येथील गजानन अर्बन बँकेतून पाच लाखाची थेली अज्ञात चोरट्याने लंपास केली. पोलिसांना या प्रकरणातील रिकामी बॅग सापडली आहे.

याबाबत माहिती अशी की, येथील मिरची व्यवसाय करणारे व्यापारी मोहम्मद तौफिक मोहम्मद शमीम यांना मजुराला पेमेंट द्यायचे असल्याने ते एसबीआय बँकेमध्ये गेले तेथून त्यांनी चार लाख रुपये काढले. त्यांच्याजवळ अगोदरचे एक लाख रुपये होते असे एकूण पाच लाख रुपये त्यांनी बॅगेत ठेवून समोरील रोड लगत असलेल्या गजानन अर्बन बँकेत गेले. गजानन अर्बन मधून पैसे काढण्यासाठी त्यांनी विड्रॉल भरून कॅश काऊंटरवर गेले असता सदरील पाच लाखाची बॅग जमिनीवर आपल्या पायाजवळ ठेवली. मात्र दहा ते वीस मिनिटातच त्यांच्या लक्षात आले की आपल्या पायाजवळ ठेवलेली बॅग गायब झाली आहे. त्यांनी बँकेत शोधाशोध केली असता सदरील बॅग चोरट्याने लांबवल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच पोलीस स्टेशनला फिर्याद



दिली. त्यानंतर थोड्याच वळात पोलिसांना ही बॅग म्हसला फाट्यावर रिकामी सापडली. दरम्यान, ही बॅग धाड येथील एका व्यापाऱ्याजवळ असल्याचे पोलिसांना समजल्यामुळे व बॅगेत कार्ड असल्यामुळे पीएसआय पठाडे यांनी तक्रारदार व पोलिसांना बरोबर घेऊन धाड येथून ती बॅग हस्तगत केली. तक्रारदार एसबीआय मध्ये पैसे काढत असताना दोन अनोळखी व्यक्ती त्याच्या अवतीभवती फिरत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये दिसून आले. हेच संशयित गजानन अर्बनच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये सुद्धा दिसून आल्यामुळे त्यांनीच ही बॅग पळवल्याचे निष्पन्न झाले.

# लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात 'आविष्कर'चे शनिवारी उद्घाटन

जालना । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हयास्तरीय आविष्कार महोत्सवलाल बहादूर शास्त्री यात येत्या शनिवारी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी दिली.विद्यार्थ्यांच्या संशोधन व जिज्ञासूवृत्तींना प्रोत्साहन देण्यासाठी राजभवनच्या वतीने राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. त्यापूर्वी ही विद्यापीठ स्तरीय स्पर्धा होत आहे. आविष्कार स्पर्धांच्या तयारीसाठी मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत चारही जिल्ह्यातील महाविद्यालय निवडण्यात आली. तसेच १० ते २४ सप्टेंबर या दरम्यान जिल्हा स्तरीय आविष्कार स्पर्धांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानूसार जालना जिल्हा- लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर १३ सप्टेंबर येथे घेण्यात येईल. या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांच्यासह आविष्कार समन्वयक डॉ.शैलेंद्र शेलार उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील सहा शाखेतील विजेते स्पर्धक केंद्रीय आविष्कारमध्ये सहभागी होतील. तर प्रत्येक जिल्ह्यातून निवडण्यात आलेले टॉप थ्री संघ हे केंद्रीय आविष्कार स्पर्धेत सहभागी होतील. ३ व ४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजी नगर येथे ही स्पर्धा होणार आहे. जिल्हास्तरावर केवळ पदवीच्या विद्यार्थ्यांचा अविष्कार होईल यामधील विजेते आणि पदव्युत्तर पदवी व पदवी तर पदव्युत्तरनंतरची पदवी या स्तरातील स्पर्धा थेट केंद्रीय स्तरावर होणार आहेत. ही स्पर्धा सहा गटात होईल. यामध्ये मानव्यविद्या, भाषा आणि ललित कला,वाणिज्य, व्यवस्थापनशास्त्र आणि विधी, विज्ञान शाखा, कृषी आणि पशुसंवर्धन अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान औषधनिर्माण शास्त्र शनिवारी उद्घाटन 'आविषकार' नवोपक्रम व संशोधन स्पर्धेचे उद्घाटन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.महेंद्र शिरसाठ यांच्या हस्ते येत्या शनिवारी दि.१३ सकाळी १० वाजता महाविद्यालयांच्या प्रांगणात होईल. संस्थेचे सचिव कपिल आकात अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी उद्योजक संजय अग्रवाल, मानव्य विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ.संजय सांळुके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.भारत खंदारे, जिल्हा समन्वयक प्रा.संदीप पाटील, समन्वयक डॉ.शैलेंद्र शेलार यांनी केले आहे.

# उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी उद्योजकतेकडे वळावे

## सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतंम यांचे आवाहन

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शिक्षक हा राष्ट्र निर्माता आहे. मला ही उत्तम शिक्षक मिळाल्याने मी आज आयुष्यात हे यश मिळवू शकलो. आपल्या समाजात अनेक तरुण उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांनी उद्योजकतेकडे वळावे, आवश्यक मार्गदर्शन करायला मी आहेच. समाज कार्याचा हा वसा आम्हाला गुरुवर्य बत्तिन यांच्या कडून मिळाला आहे.गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन म्हणजे पद्मशाली समजाचा दीपस्तंभ आहेत, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अहिल्यानगरचे सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले. येथील कै. गुरुवर्य पोट्यन्ना बत्तिन शैक्षणिक, सामाजिक मंडळाच्या वतीने आयोजित शिक्षकांचा सत्कार व पदविका पदवीधर विद्यार्थ्यांच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष माजी प्राचार्य बाळकृष्ण सिद्धम हे होते. व्यासपीठावर मंडळाचे सचिव माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटिपामुल, कार्याध्यक्ष, ज्ञानेश्वर मंगलारम, प्रा. वीरभद्र बत्तीन, कृष्ण संभार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी केले, तर मंडळाचे सहसचिव कृष्णा संभार यांनी पंतम यांच्या परिचयातून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. माजी प्राचार्य सिद्धम म्हणाले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, साने गुरुजी, ग. प्र. प्रधान यांच्यासारखेच गुरुवर्य पोट्ट्याना बत्तिन हे ध्येयवादी शिक्षक होते. शिक्षकी पेशा त्यांनी आपल्या अशिक्षित समांजाला सुशिक्षित, सज्ञान करण्यासाठी व्रत म्हणून स्वीकारला. त्यांचा आदर्श घेऊन आम्ही आयुष्यभर काम केले आणि भावी पिढीने ही त्यांच्या आदर्श विचाराचा वारसा जपायला हवा.

यावेळी व्हिएतनाम येथे झालेल्या एशियन पॉवर लिफटिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत एक सुवर्ण व एक कांस्य पदकाची कमाई करणाऱ्या देवदत्त प्रवीण गुंडू, नवीन शैक्षणिक धोरणाच्या पंचवार्षिक पूर्ती निमित्त दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय शिक्षा संगम कार्यक्रमात निमंत्रित अतिथी म्हणून सहभागी झाल्या बद्दल राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक नारायण चंद्रकांत मंगलारम, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य पुरस्काराचे मानकरी लक्ष्मीकांत इडलवार यांचा सन्मान चिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. यानंतर सेवेतील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सत्काराची उद्घोषणा मंडळाचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम यांनी केली. उपशिक्षिका रेखा बुरा यांनी शिक्षक सत्कारास उत्तर दिले. पदविका पदवीधर व पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पारितोषिकाची घोषणा मीना बत्तिन यांनी केली. सूत्रसंचालन श्रीनिवास यल्लाराम व साईगीता सब्बन यांनी, तर आभार मंडळाचे सचिव माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल यांनी मानले.

# आपला स्वत:वर विश्वास असेल तर भाग्यरेषाही बदलता येतात -धानोरकर

शेवगाव । प्रतिनिधी

''स्वत:वर विश्वास असेल तर तळाहातीच्या भाग्यरेषा सुद्धा बदलता येतात, गरज असते ती मोठी स्वप्ने पाहण्याची आणि स्वत:च्या क्षमतांना न्याय देत शिस्तबद्ध नियोजनाची', असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी केले.

येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळ आयोजित गंगा मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेत गुरुवारी (११ सप्टेंबर) ''झपाटलेपण ते जाणतेपण' विषयावर चौथे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, ''संयम, शिस्त आणि संस्कार ही आयुष्य आनंदात जगण्याची त्रिसूत्री असून मोबाइल व समाजमाध्यमे यांच्यापासून दूर राहिल्यास विद्यार्थी स्वत:ची स्वप्ने नक्कीच पूर्ण करू शकतात.' विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलास उत्तरे देत त्याचे




मन जिंकले. रागिणी भारदे व स्नेहा भारदे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेचे गुणवंत माजी विद्यार्थी वनक्षेत्रपाल आदिनाथ घनवट यांचा सत्कार प्रा.रमेश भारदे, निमंत्रक हरीश भारदे ,प्रा.संजय कुळकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. अनुराधा जोशी यांनी सूत्रसंचालन केले तर नितीन मालाणी यांनी आभार मानले. व्याख्यानाला पालक, शिक्षक, विद्यार्थी यांची मोठी उपस्थिती होती.

# घरफोडी प्रकरणातील आरोपी अटक

## बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत घरफोडी व दागिने चोरी प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. घटना अशी होती की, बीड शहर मधील पिंगळे गल्लीतील रहिवासी धनराज गुरखुदे हे त्यांच्या पत्नीच्या उपचारासाठी कुटुंबासह छ.संभाजीनगर येथे गेले होते. त्या काळात घराला कुलूप लावून ते बाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने घराची कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील सोने-चांदीसह मौल्यवान वस्तू चोरी केल्या.

ही गंभीर घटना घडल्यानंतर पोलीस ठाणे बीड शहर येथे फिर्यादी मार्फत गुन्हा दाखल झाल्यावर पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी तात्काळ तपास गतीमान करण्याच्या सूचना बीड शहर पोलिसांना दिल्या. तपासादरम्यान तांत्रीक माहिती आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित हा स्थानिक रहिवाशी शिवा नंदलाल गुरखुदे असल्याचे उघड झाले. त्याचा शोध घेतला असता, आरोपी हा चोरीनंतर बीड शहरातून गायब झाला होता. त्याच्यावर याआधीही जबरी चोरी, मारामारी असे विविध गुन्हे दाखल असून तो सतत गुन्हेगारी करणारा व बीड पोलिसांच्या अनेक गुन्ह्यात वॉन्टेड आरोपी होता. दरम्यान, गुप्त माहितीच्या तसेच आधारे पोलिसांना कळाले की आरोपी शिवा हा नांदेड येथील गणेशोत्सव कार्यक्रमांना नियमित जात आहे. ही माहिती मिळताच बीड पोलिसांच्या पथकाने नांदेड येथे गुप्तपणे सापळा लावला त्यावेळी आरोपी हा गणेशोत्सव कार्यक्रमात आला असताना पोलिसांनी योग्य वेळी दबा धरून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. अटक केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर ,पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पीएसआय महेश जाधव, पोलिस अंमलदार गहिनीनाथ बावनकर ,राम पवार यांनी केली.



# बीड-परभणी शिवशाही बसमध्ये वाहकाची मोगलशाही, प्रवाशांना अश्लील भाषा वापरून अरेरावी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**बीड आगाराच्या शिवशाही बस मध्ये वाहक ए ए बनकर यांनी मोगलशाही करुन प्रवाशांना अश्लील भाषा वापरून अरेरावी केल्याचा प्रकार दि १२ सप्टेंबर शुक्रवार रोजी दुपारी तेलगाव माजलगाव प्रवासा दरम्यान घडला असुन या वाहकाची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आगर प्रमुख बीड सह परिवहन मंत्री यांच्या कडे करण्यात येईल असा इशारा प्रवाशांनी दिला आहे.**



बीड आगाराची शिवशाही बस क्र एम एच ०६ बी. डब्ल्यु ०९३७ ही बस बीड ते परभणी दि १२ सप्टेंबर शुक्रवार रोजी ३:०० वाजता तेलगाव बस स्थानकात आली माजलगावला जाण्यासाठी काही प्रवासी बसमध्ये बसले असता बस वाहक बीड ००१,०६७३६९ बॅच नंबर असलेले वाहक ए ए बनकर यांनी सुट्टे पैशाच्या कारनावरुन प्रवाशांना अश्लील भाषा वापरून अरेरावी करून अपमानीत केल्याचा प्रकार घडला आहे, एकीकडे परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांना सौजन्यच्या धडे देत असताना हे बनकर वाहक मात्र मोगला सारखे वागत असल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट पसरली असून या वाहकावर बीड आगार प्रमुख यांनी कारवाई करावी नसात त्यांची तक्रार परिवहन मंत्री यांच्या कडे करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# उपळी आरोग्य उपकेंद्र बंद : गावकऱ्यांनी ठोकले कुलूप

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी गावात दहा ते बारा हजार लोकसंख्येच्या आरोग्याच्या सोयीसाठी उपकेंद्राची सुसज्ज इमारत उभारली असली तरी संबंधित अधिकारी सतत गैरहजर राहिल्याने उपकेंद्र बंद अवस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांना उपचारासाठी १५ किलोमीटर अंतरावर तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असून आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

आज गावकऱ्यांनी उपकेंद्राला भेट दिली असता ते बंद असल्याचे आढळून आले. संतप्त ग्रामस्थांनी याबाबत तालुका




वैद्यकीय अधिकाऱ्यांना संपर्क केला. काही तासांनंतर संबंधित अधिकारी येऊन उपकेंद्राचे दार उघडण्यात आले. परंतु, वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे नागरिकांनी पुन्हा उपकेंद्राला कुलूप ठोकून आपला रोष व्यक्त केला.

कुप्पा येथील आरोग्य अधिकारी डॉ. मारोती लगड यांनी घटनास्थळी धाव घेऊन ग्रामस्थांना आश्वासन दिल्यानंतर कुलूप काढण्यात आले. उपकेंद्रात गेल्या अनेक वर्षांपासून मदतनीसाची जागा रिक्त आहे. तसेच इमारत गावाबाहेर असल्याने रुग्ण व अधिकारी यांच्यासाठी पाण्याची समस्या भेडसावत आहे. फिल्टर बसविण्याचे काम गुत्तेदाराने अर्धवट सोडल्याने अडचण अधिक वाढली आहे.

यावेळी उपसरपंच विनायक शेळके, सामाजिक कार्यकर्ते डॉ. दत्तात्रय दुधाने, तन्वीर पटेल, बाळासाहेब शेळके, राम बापू सावंत, सत्यनारायण आजबे, आकाश सावंत, श्रीहरी सावंत, अर्जुन सावंत यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी आरोग्य विभागाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# डिजिटल मिडिया परिषदेच्या संभाजीनगर अधिवेशनास राज्यभरातून पत्रकार येणार : एस.एम.देशमुख

संभाजीनगर । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची एक विंग असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर येथे होत असून अधिवेशनास एक हजार पत्रकार उपस्थित राहतील असा विश्वास एस.एम.देशमुख यांनी व्यक्त केला आहे..



डिजिटल मिडियातील पत्रकारांची संख्या उत्तरोत्तर वाढत असून त्यांना संघटीत करून त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत अधिवेशनात विचार विनिमय करून ठोस भूमिका घेतली जाणार आहे..

क्रांती चौक परिसरातील एकनाथ रंगमंदिर येथे पालकमंत्री संजय शिरसाट आणि कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून एस.एम.देशमुख अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी असतील.. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित

## अधिवेशनाला उपस्थित रहा- मोकाशे

संभाजीनगर येथे डिजिटल मीडिया परिषदेचे ऐतिहासिक अधिवेशन होत आहे. या अधिवेशनाला मराठवाड्यातील परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे राज्याचे उपाध्यक्ष तथा दैनिक लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांनी केले आहे.



# बंजारा समाजाच्या एस.टी आरक्षण हक्काच्या मागणीला पाठिंबा - आ.प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या व प्रशासकीय नोंदींनुसार आदिवासी समाजामध्ये आहे. परंतु मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावर सन १९५६ नंतर या समाजाला ओबीसी/एनटी प्रवर्गात सामाविष्ट करण्यात आले. तेलंगणा व आंध्र प्रदेशात (निजाम संस्थान) गॅझेटचा आधार घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे.**



संघर्षयोध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील मागणीनुसार मराठा समाज बांधवांना दि.०२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार हैद्राबाद गॅझेटियर लागू केले. मराठवाड्यातील बंजारा (लमाण) समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गात सामिल करून त्यांना या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ देण्याची योग्य ती नियमोचीत कार्यवाही करून उपकृत करावे आशा आशयाच्या पाठिंब्याचे पत्र महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आ.प्रकाश सोळंके यांनी दि १२ सप्टेंबर शुक्रवार रोजी बंजारा बांधवांच्या शिष्टमंडळास देण्यात आले आहे. हा पाठिंबा केवळ पत्रापूरता नसून या लढ्यात जेव्हा जेव्हा गरज लागेल तेव्हा सोबत असेल अशी ग्वाही यावेळी आ.प्रकाश सोळंके यांनी बंजारा समाज बांधवांना दिली.



**डॉक्टर चंद्रकांत गोसावी यांची कन्या कु. शर्वरी हिला श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज, पुणे या ठिकाणी शासकीय कोठ्यातून एमबीबीएस करता प्रवेश मिळाला आहे तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना माजी आमदार मा.भीमरावजी धोंडे साहेब**

# डॉ.सुधीर तांबे व आ.सत्यजीत तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा विभागीय शिबिर

बीड । प्रतिनिधी

सामाजिक समतेचे भान, युवकांचे सशक्तीकरण व महिलायुवक नेतृत्व विकास या मुख्य उद्दिष्टांसह जयहिंद लोकचळवळ, महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित मराठवाडा विभागीय शिबिराचे बीड जिल्ह्यात आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १९ व २० सप्टेंबर रोजी भव्य स्वरूपात पार पडणार असून मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांमधील युवक, कार्यकर्ते व समाजातील प्रबोधनशील व्यक्तींना या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या शिबिरातील विशेष सत्र १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सौभाग्य लॉन्स, पांगरी रोड, बीड येथे होणार असून या सत्राचे प्रमुख मार्गदर्शन मा.आ. डॉ. सुधीर तांबे, संस्थापक अध्यक्ष, जयहिंद लोकचळवळ करणार आहेत. तसेच या सत्रात मुख्य प्रशिक्षक म्हणून श्रीकांत लक्ष्मीशंकर उपस्थित राहतील. संघटनेचे अनेक मार्गदर्शक व मान्यवरही या सत्रात सहभागी

# जिल्ह्यात सर्वांनी सामाजिक सलोखा टिकवणे गरजेचे -मुफ्ती अशफाक साहब

## मुस्लिम समाजाने प्राधान्यपूर्वक शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात बुधवार दि १० सप्टेंबर रोजी ईद मिल्लादुनबी साजरी करण्यात आली. त्या निमित्तने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंडीत अठराव्या वर्षी गवळीपुरा मित्रमंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ८५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत आपले सामाजिक उत्तरदायित्व सिद्ध केले. या कार्यक्रमाचे उदघाटक



म्हणून राजकिशोर मोदी तर कार्यक्रमाच्या अध्यस्थानी परळी येथील मुफ्ती अशफाक साहब हे होते. विशेष अतिथी म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, हाजी इस्माईल सेठ गवळी, डॉ राजेश इंगोले, पत्रकार दत्तात्रय आंबेकर मुजीब काजी सर हे होते.त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून सुनील सेठ वाघळकर, ऍड इस्माईल गवळी, मदार गवळी, महादेव आदमाने, धमपाल सरवदे, अंकुश हेडे, आकाश कराड उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना अंबाजोगाई चे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी म्हणाले की मोहंमद पैगम्बर यांनी दिलेल्या शिकवणी वर आमचे सहकारी जावेद भाई, मुक्तार भाई, खलील भाई, अमजत भाई हे चालत आहेत. रक्तदान सारखे सामाजिक काम ते सतत अठरा वर्षा पासून करत असल्या बद्दल त्यांनी यावेळी आनंद व्यक्त केला. पुढे बोलताना त्यांनी मुस्लिम समाजात शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते मात्र तसे न होता समाजाने प्राधान्य क्रमाणे

# नगरपरिषदेसह सामाजिक संस्थांच्या पुढाकारातून बीड शहराचे सौंदर्यीकरण

**बीड । प्रतिनिधी**

शहराचे सौंदर्यीकरणासाठी बीड नगरपरिषदेत मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या अध्यक्षतेखाली विविध सामाजिक संस्थांची गुरुवारी (दि.११) बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची उपस्थिती होती. शहरातील रस्त्यांचे डेव्हलपमेंट, वृक्षलागवड, स्वच्छता, सुशोभीकरण, सार्वजनिक सोयीसुविधा या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये प्रस्तावित नवीन रोड व डीपी रोडमध्ये वृक्षारोपणासाठी जागा सोडून अंडरग्राउंड ड्रिपद्वारे पाणीपुरवठ्याची

## डॉ.योगेश क्षीरसागर यांची सीओंसोबत चर्चा; वृक्षलागवड, सुशोभीकरण, फाऊंटेन, पार्किंगच्या मुद्द्यांकडे वेधले लक्ष



सोय करणे, बंद असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळेच्या ठिकाणी भाजी मंडई व महिला बचत गटासाठी मॉल उभारणे, शहरातील ओपन स्पेसला तारकंपाउंड करून वृक्षलागवड करणे, नवीन फुलांचे गार्डन प्रस्तावित करणे, चौक सुशोभीकरणांतर्गत शहरातील प्रमुख चौकात फाउंटेन उभारणे, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्समधील आतील जागा पार्किंगसाठी उपलब्ध करणे, जालना रोड दुभाजकाचे सुशोभीकरण करणे, शहर व उपनगरातील ओपन स्पेसमध्ये घनदाट जंगल प्रकल्प उभारणे हे निर्णय घेतले. बैठकीत कोटक महिंद्रा बँकेने सामाजिक जबाबदारी अंतर्गत १ घंटागाडी व १०० डस्टबीन देण्याचे पत्र नगरपरिषदेला सुपूर्द केले. याबाबत उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. ही छोटेखानी बैठक झाली असली तरी लवकरच व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी फडसे यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आय.एम.ए. जिल्हाध्यक्ष डॉ. अनंत मुळे, रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर, शहराध्यक्ष राहुल बोरा, झाडांची भिसीच्या प्रतिनिधी डॉ. नाईकवाडे, तसेच बँक ऑफ महाराष्ट्र, एचडीएफसी बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, कॅनरा बँक, कोटक बँक, आयडीबीआय आदी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पंजाब पूरग्रस्तांना आर्थिक मदत

## पूरग्रस्तांना मदत ही सेवा आहे -प्राचार्य विश्वास कदम



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंजाब राज्यात झालेल्या पूर परिस्थितीत राज्याचे प्रचंड नुकसान झाले या राज्यातील लोकांना आर्थिक मदत करण्यासाठी महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या हस्ते व महाविद्यालयाची सन्माननीय प्राचार्य डॉक्टर सोमनाथ घाडगे सर यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून कराटे प्रशिक्षक मा ककारसिह टाक यांना महाविद्यालयाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली महाराष्ट्रातून सचखंड गुरुद्वारा बोर्ड नांदेड तर्फे मदत पोहोचली जाणार आहे आर्थिक मदत करताना महाविद्यालयातील सर्व कर्मचारी यांनी आर्थिक मदत केलेली आहे महाविद्यालयाची प्राचार्य मार्गदर्शक प्राचार्य यांच्या हस्ते ही मदत देण्यात आली

# मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी यांचे निधन

## आज छत्रपती संभाजीनगर येथे अंत्यविधी

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्याच्या पत्रकारितेमध्ये मराठवाडा साथी या दैनिकाला उंची मिळवून देणारे,सतत सकारात्मक पत्रकारितेचे बीजे रोवणारे,तरुण पत्रकारांचे संस्कारपीठ असलेले सतीश मोहनलाल बियाणी यांचे शुक्रवार दि. १२ सप्टेंबर रोजी सायं. ५.०० च्या दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण मराठवाडा विभाग पोरका झाला आहे.त्यांच्यावर आज शनिवार दि.१३ सप्टेंबर रोजी स. ११.०० वा. छत्रपती संभाजीनगर येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.



सतीश मोहनलाल बियाणी हे पत्रकारितेमधील दीपस्तंभ होते. सकारात्मक पत्रकारिता हा एकमेव गुण त्यांनी जोपासला. त्यासोबतच दिलदार मित्र अशी त्यांची ओळख होती. सतीश बियाणी यांच्या निधनाने मराठवाडा साथी पोरका झाला आहे. त्यांच्या पश्चात आई श्रीमती राधाबाई बियाणी, मोठे बंधू चंदूलाल बियाणी, लहान बंधू उद्योजक जगदीश बियाणी,पत्नी, एक विवाहित मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे. बियाणी परिवार कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# कडा परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड वन विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात मागील काही दिवसांपासून वन विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे अवैध वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु याकडे वन दुर्लक्ष होत आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष देवून परिसरात होणारी अवैध वृक्षतोड थांबवावी, अशी मागणी पर्यावरण प्रेमी व नागरिक करत आहेत.

कडा मंडळात परिसरात सध्या बाभूळ, आंबा, निंब, व इतर झाडांची अवैध वृक्ष तोड करून खुलेआम ट्रक आणि ट्रॅक्टरद्वारे दुसऱ्या राज्यांमध्ये

वाहतूक केली जाते. तसेच करीत वनविभाग बाजूलाव खासगी याकडे सध्या डोळेझाक असल्याने रस्त्याच्या क्षेत्रातून बाभळी, लिंब व इतर झाडांची कत्तल केली जात आहे. या वृक्षतोडीस जबाबदार कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी, अशी मागणी वृक्षप्रेमी ज्येष्ठ नागरिक करत आहेत.व ही वाहतूक दिवसा काही प्रमाणात तर रात्री अपरात्री मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यामुळे सध्या तालुक्यात एकीकडे झाडे लावली जात असताना दुसरीकडे कडा मंडळात जुनी वृक्ष तोडली जात आहेत. तालुक्यात गेल्या दोन वर्षापासून अवैध वृक्षतोडीचा एकही गुन्हा दाखल झाला आहे का ? झाडांच्या फांद्या तोडण्याच्या नावाखाली झाडेच तोडली जात आहे. नवीन शासनाच्या जीआर नुसार अवैध प्रत्येकी वृक्ष तोडीस पन्नास हजार रूपये दंड आहे. हा केवळ कागदावरच आहे काय तालुक्यातील सर्व बीटवर हप्ते खोरी वाढली आहे . तालुक्यात वृक्षतोड होवून त्याचीपरराज्यात सुद्धा विक्री केली जात असल्याचे सुत्रांनी सांगीतले आहे. वृक्ष तोडीसाठी कामगारांची टोळी इलेक्टीक करावी व वाहने घेवून रोज सकाळी वृक्ष तोडीसाठी निघालेली दिसत आहेत. या अवैध वृक्ष तोडी मुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे दिसून येत आहे. याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. याकडे वरीष्ठ अधिकारी लक्ष देणार का? असा प्रश्न सध्या तालुक्यातील जनतेतून विचारला जात आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गंजपेठेत अंमली पदार्थांवर पोलिसांचा धाडसी छापा; २४ किलो भांग जप्त, एका महिलेला अटक

पुणे। प्रतिनिधी

खडक पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुप्त माहितीच्या आधारे गंजपेठ परिसरात छापा टाकून एका महिलेला अटक केली. तिच्याकडून २४ किलो वजनाचे २८० भांगाचे गोळे, रोख रक्कम व तयार करण्याचे साहित्य असा एकूण १.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिता तोंडे, सहा. पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे उपनिरीक्षक महेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी पोलीस कर्मचारी अशिष चव्हाण , तांबोळी, नदाफ, पठाण, गायकवाड तसेच महिला कर्मचारी रुपनवार आदींचा समावेश असलेल्या पथकाने ही कारवाई केली.

छाप्यात रोहिणी सुरेश चव्हाण ( ५२, रा. गंजपेठ) हिला घरासमोरील अंगणात भांगाचे गोळे विक्री करताना पकडण्यात आले. तपासादरम्यान तिच्या घरातून भांग



तयार करण्यासाठी लागणारे फ्रिज, यंत्रणा, पावडरने भरलेल्या सात गोण्या आणि इतर साहित्य आढळले. पोलिसांनी जप्त केलेल्या पदार्थाचे पंचासमक्ष नमुने सीलबंद करून पंचनामा केला आहे. आरोपी महिलेविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १२३ सह मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ड)(छ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ११ – खडक पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुप्त माहितीच्या आधारे गंजपेठ परिसरात छापा टाकून एका महिलेला अटक केली. तिच्याकडून २४ किलो वजनाचे २८० भांगाचे गोळे, रोख रक्कम व तयार करण्याचे साहित्य असा एकूण १.२१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई सहा. पोलीस निरीक्षक अनिता तोंडे, सहा. पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे उपनिरीक्षक महेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी पोलीस कर्मचारी अशिष चव्हाण , तांबोळी, नदाफ, पठाण, गायकवाड तसेच महिला कर्मचारी रुपनवार आदींचा समावेश असलेल्या पथकाने ही कारवाई केली.

छाप्यात रोहिणी सुरेश चव्हाण ( ५२, रा. गंजपेठ) हिला घरासमोरील अंगणात भांगाचे गोळे विक्री करताना पकडण्यात आले. तपासादरम्यान तिच्या घरातून भांग तयार करण्यासाठी लागणारे फ्रिज, यंत्रणा, पावडरने भरलेल्या सात गोण्या आणि इतर साहित्य आढळले.पोलिसांनी जप्त केलेल्या पदार्थाचे पंचासमक्ष नमुने सीलबंद करून पंचनामा केला आहे. आरोपी महिलेविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १२३ सह मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ड)(छ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बंडू आंदेकरच्या घरावर पोलिसांचा छापा घरातून कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

**कुख्यात गुंड बंडू आंदेकर याच्या घराची पोलिसांनी घेतलेल्या झडतीत कोट्यवधी रुपयांचा ऐवज हाती लागला आहे. पोलिसांनी तब्बल ६७ लाखांचे सोन्याचे दागिने, चांदी, २ लाख ५० हजार रुपयांची रोकड, एक अलिशान मोटार कार, विविध करारनामे आणि कर भरल्याच्या पावत्या, असा मोठा मुद्देमाल जप्त केला. याशिवाय आंदेकरने केलेल्या जमीन व्यवहाराच्या काही इसार पावत्याही पोलिसांना मिळाल्या आहेत.**



दरम्यान, आयुष उर्फ गोविंद गणेश कोमकर (वय १९, रा. नाना पेठ) या महाविद्यालयीन तरुणाच्या खुनाचा तपास आता गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.गृहकलहातून बंडू आंदेकरने स्वतःच्याच नातवाच्या हत्येचा कट रचला होता. ५ सप्टेंबरला गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला रात्री साडेसातच्या सुमारास नाना पेठेत हल्लेखोरांनी आयुष कोमकरवर गोळ्यांचा वर्षाव केला. गंभीर जखमी झालेल्या आयुष्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. खुनानंतर आंदेकर कुटुंबासह प्रवास करून देवदर्शनासाठी निघाला होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे.खुनाच्या तपासादरम्यान १० सप्टेंबरला संध्याकाळी पाच वाजता पोलिसांनी आंदेकरच्या घरावर सर्च ऑपरेशन केले. गुरुवारी (११ सप्टेंबर) पहाटे चार वाजेपर्यंत चाललेल्या या कारवाईत पोलिसांना कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत झाला. या कारवाईनंतर आंदेकरच्या आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.

### तपास गुन्हे शाखेकडे

आयुष कोमकर हत्येप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक झाली आहे. उर्वरित पाच आरोपींचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखेच्या विविध पथकांना कामाला लावण्यात आले आहे. आंदेकर टोळीला मदत करणाऱ्यांची सविस्तर माहिती गोळा करून त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# सांगवी येथील मोफत महाआरोग्य शिबिराचा ३५० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे सांगवी गावठाण येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३५० हून अधिक नागरिकांनी विविध तपासण्यांचा लाभ घेतला. यावेळी १०० हून अधिक नागरिकांचे आयुष्मान कार्डे तयार करून देण्यात आले.**

शिबिराचे उद्घाटन महापालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. अंजली ढोणे यांच्या हस्ते,माजी महापौर माई ढोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रज्ञा बडगे, फिजिशियन डॉ. देवयानी लोंढे, बालरोगतज्ज्ञ डॉ. दीपक पाटील उपस्थित होते. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी दंत तपासणी, नेत्र तपासणी, कान–नाक–घसा तपासणी, बालकांची व किशोरवयीन मुलांची तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, वृद्ध नागरिकांची तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी, लहान मुलांचे लसीकरण, रक्त तपासणी तसेच औषधांचे वितरण अशा सर्व सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. याशिवाय नागरिकांना आयुष्मान कार्डे व आभा कार्डे काढून देण्यात आले. भूलरोगतज्ज्ञ डॉ. मोनाली क्षीरसागर यांनी उपस्थितांना सीपीआरचे प्रात्यक्षिक करून आवश्यक ते मार्गदर्शन केले.



महाआरोग्य शिबिरामध्ये नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि जनजागृती उपक्रम याद्वारे नागरिकांना सर्वसमावेशक सेवा देणे हा महापालिकेचा प्रयत्न आहे. अशा शिबिरांमुळे नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत मिळते.
– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांमधील व मोफत शिबिरांमधील सेवा नागरिकांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. प्रतिबंधात्मक तपासण्या आणि लसीकरण यामुळे नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम करण्याचा आमचा मानस आहे.
– डॉ. लक्ष्मण गोफणे, वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

# इंदापूर शहरात हरिनामाच्या गजरात नगर प्रदक्षिणा दिंडी

इंदापूर

श्रीगुरु नामदेव अण्णा वसेकर पुण्यतिथी उत्सव समिती यांच्या वतीने श्री गुरु बाबासाहेब आजरेकर फड २२५ वर्ष स्थापना पूर्ती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व माऊली गाथा पारायण सोहळ्याच्या निमित्त इंदापूर शहरात नगर प्रदक्षिणा दिंडी सोहळा शुक्रवार (ता. १२ सप्टेंबर) रोजी पार पडला. इंदापूर शहरातील सर्वधर्मीय बांधवांनी दिंडी सोहळ्याचे उस्फुर्त स्वागत केले.

तर मुख्य बाजारपेठेत शहा परिवाराच्या वतीने इंदापूर नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष अंकिता मुकुंद शहा, शहा ग्लोबल स्कूल संस्थेचे विश्वस्त मुकुंद शहा, कर्मयोगी शंकरराव पाटील साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन भरत शहा, नारायणदास रामदास ट्रस्टच्या वैशाली शहा, तसेच शहा ग्लोबल स्कूलचे अंगद शहा, रुचिरा शहा, यांनी वारकऱ्यांचे मानाच्या विणेकरी यांचे पूजन करून, सांप्रदायाच्या प्रथेप्रमाणे फुगड्या झिम्मा खेळून आनंद व्यक्त करून, ज्ञानोबा तुकाराम च्या गजरात दिंडी सोहळ्याचे विधिवत स्वागत केले.

या सप्ताहाची सुरुवात विना पूजन, कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हॉइस चेअरमन भरत शहा व त्यांच्या सुविद्य पत्नी वैशालीताई शहा यांच्या हस्ते करण्यात आले होते. या अखंड हरिनाम सप्ताहात किर्तन, प्रवचन, भजन, हरिपाठ काकडा तब्बल सात दिवस हरी नामाचा गजर करत झाला असून, यामध्ये ह भ प सागर महाराज बोराटे नातेपुते, ह भ प देवेंद्र महाराज निडाळकर गाथा मूर्ती, श्री गुरु जयवंत महाराज बोधले पंढरपूर, चिन्मय महाराज सातारकर मुंबई, अमृत महाराज जोशी बीड, श्री गुरु हरिदास रामभाऊ बोराटे आजरेकर, यांची कीर्तने पार पडली.



तर काल्याचे किर्तन शनिवार (ता. १३) सकाळी १० ते १२ या वेळेत श्रीगुरु हरिदास रामभाऊ बोराटे आजरेकर यांचे होणार असून महाप्रसाद वै.ह.भ.प.गोकुळदास शहा यांच्या स्मरणार्थ शहा परिवाराच्या वतीने वाटप करण्यात येणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाचे संयोजक श्री गुरु नामदेव अण्णा माळी वशेकर पुण्यतिथी उत्सव समितीचे अध्यक्ष ह भ प भरत शहा यांनी केले. या अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या कीर्तनासाठी तालुक्यातील भाविक भक्तांनी हरी नामाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# लोकअदालतीच्या नियोजनाचा फज्जा! नागरिकांची गैरसोय; ऑनलाइन सुविधा देण्याची मागणी



पुणे । प्रतिनिधी

वाहतूक नियमभंगांवरील प्रलंबित दंड सवलतीत भरण्याची सुवर्णसंधी म्हणून जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीच्या उपक्रमाचे नियोजन पहिल्याच दिवशी कोलमडले. दंड भरण्यासाठी नागरिकांनी पहाटेपासूनच येरवडा पोस्ट ऑफिसशेजारील वाहतूक शाखा कार्यालयात मोठी गर्दी केली. मात्र, रोज केवळ २०० ते ३०० टोकन वाटपाची मर्यादा ठेवण्यात आल्याने हजारो नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. टोकन संपल्यावर उद्या या अशा सूचना मिळाल्याने नाराज नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. सकाळी सहा वाजताच रांगा लागायला सुरुवात झाली. पण, व्यवस्था अपुरी आणि जागा मर्यादित असल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. वयोवृद्ध, महिला आणि कामकाजासाठी वेळ काढून आलेल्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेकांनी पोलिस प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

आम्ही एवढ्या लांबून आलो, पण टोकन संपल्याचे सांगून आम्हाला परत पाठवले. जर सुविधा ऑनलाइन केली असती, तर हा त्रास टाळता आला असता, अशी प्रतिक्रिया एका नागरिकाने दिली

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, १३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याआधारे पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि पुणे शहर वाहतूक पोलिसांनी १० ते १३ सप्टेंबरदरम्यान प्रलंबित दंड तडजोडीने निकाली काढण्याची योजना आखली आहे. या उपक्रमाला प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन, सचिव न्यायाधीश सोनल पाटील, मोटार वाहन न्यायालयाचे न्यायाधीश एस. बी. पाटील, पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि वाहतूक उपायुक्त हिम्मत जाधव यांचा सहभाग आहे.

# शिरूरमध्ये बिबट्याचा हौदोस; शेतकऱ्यावर हल्ल्याचा प्रयत्न

**जांबुत । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्याच्या बेट भागात बिबट्याचा हौदोस सुरूच असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील आठ दिवसांत पिंपरखेड (ता. शिरूर) येथील शेतकरी बबन सोनू बोंबे यांच्या घरालगत वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला होता.ही घटना ताजी असतानाच आज शुक्रवारी ( दि. १२) रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास पिंपरखेड परिसरातील दत्तवाडी येथे एका शेतकऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. दत्तात्रय जयसिंग बोंबे असं हल्ला करण्यात आलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.



शेतकरी दत्तात्रय जयसिंग बोंबे हे आपली पत्नी अक्षदा यांचेसह शेतात भेंडीची तोडणी करत होते. भेंडी तोडत असताना दोघांच्याही नजरा खाली होत्या. सुदैवाने हातात तोडलेली भेंडी गोणीत टाकत असताना पती दत्तात्रय यांच्या मागे अंदाजे ४ ते ५ फूट अंतरावर हल्ल्याच्या प्रयत्नात दबा धरून बसलेला बिबट्या हल्ला करणार तोच आपण आरडाओरडा केल्याने बिबट्याने शेजारील मकाचे शेतात धूम ठोकली. तसेच मागील दोन दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर वाढला असून रात्रीच्या वेळी जोराच्या डरकाळी ऐकू येत असल्याचे दत्तात्रय यांची पत्नी अक्षदा बोंबे यांनी सांगितले.दिवसाढवळ्या होणाऱ्या बिबट्याच्या भीतीने नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येत असून वनविभागाने शेतकऱ्यांच्या बळी जाण्याची वाट न बघता बिबट्याचा कायमचा बंदोबस्त करावा अशी मागणी संतप्त शेतकरी करत आहेत.

# रील स्टार प्रतीक शिंदेच्या फॉर्च्युनरचा भीषण अपघात, पुणे-सोलापूर महामार्गावर घडली दुर्घटना

पुणे (इंदापूर) : सोशल मीडियावर रील्समुळे प्रसिद्ध असलेल्या प्रतीक शिंदेच्या नव्या टोयोटा फॉर्च्युनरने भरधाव वेगात ह्युंदाई क्रेटाला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात घडला आहे. या धडकेत तिन्ही वाहनांचे लाखोंचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना पुणे–सोलापूर महामार्गावर गुरुवारी (११ सप्टेंबर) सायंकाळी ५ वाजता मदनवाडी (सकुंडे वस्ती) येथे घडला आहे.

भिगवण पोलिसांनी फॉर्च्युनर चालक प्रतीक राम शिंदे (वय २४, रा. भादलवाडी, ता. इंदापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताने 'फिल्मी स्टाईल ड्रायव्हिंग'वर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिकांमध्ये संतापाची लाट आहे. निखील बाळासाहेब होले (रा. अकलूज, सोलापूर) आपली ह्युंदाई क्रेटा घेऊन महामार्गावरून प्रवास करत होते. यावेळी प्रतीक शिंदेची काळी टोयोटा फॉर्च्युनर भरधाव वेगाने पाठीमागून आली आणि क्रेटाच्या बाजूला जोरदार धडकली. या धडकेचा जोर इतका होता की, क्रेटा पुढे असलेल्या मारुती व्हॅगन आरवर जाऊन आदळली.



यामुळे तिन्ही गाड्यांचा चक्काचूर झाला. फॉर्च्युनरचा पुढचा भाग तुटला, क्रेटाचा मागचा भाग खराब झाला, तर व्हॅगन आरच्या पुढील बाजूचे मोठे नुकसान झाले. या अपघातामुळे महामार्गावर काही वेळ वाहतूक ठप्प झाली. स्थानिकांनी आणि पोलिसांनी तातडीने धाव घेऊन वाहने बाजूला केली. क्रेटामधील प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या, पण सर्वजण सुखरूप आहेत. प्रतीक राम शिंदे (२४) हा इंदापूरमधील सोशल मीडिया रील स्टार आहे. त्याचे रेसिंग, स्टंट आणि लक्झरी कार्सचे व्हिडिओ इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्सना आकर्षित करतात. त्याने महिन्याभरापूर्वीच टोयोटा फॉर्च्युनर खरेदी केली होती, ज्याचे फोटो आणि रील्स त्याने सोशल मीडियावर शेअर केले होते. प्रतीक स्वतः फॉर्च्युनर चालवत होता. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, जास्त वेग आणि अचानक ओव्हरटेकिंगमुळे हा अपघात घडला. त्याच्या गाडीने क्रेटाला बाजूने धडक दिल्याने साखळी अपघात झाला. भिगवण पोलिसांनी फिर्यादी निखील होले यांच्या तक्रारीवरून प्रतीकविरुद्ध निष्काळजी ड्रायव्हिंगसाठी गुन्हा दाखल केला आहे.

# माळेगावात अवैध दारूच्या वाहतुकीवर धडक कारवाई; १० आरोपी ताब्यात

माळेगाव । प्रतिनिधी

माळेगाव परिसरात अवैध गावठी दारू वाहतुकीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग बारामती यांच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत १० आरोपींना ताब्यात घेऊन १४.९१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये २२९५ लिटर गावठी दारू, तीन दुचाकी, तीन चारचाकी वाहने, आणि एक टेम्पोचा समावेश आहे.

सुग्रीव अंकुश भंडलकर व सिताराम अंकुश भंडलकर (रा. खांडज, ता. बारामती), नवनाथ सदाशिव गव्हाणे (रा. माळेगाव खुर्द), काशिनाथ सुरेश चव्हाण



(रा. वरळेगाव, पो. बोरमणी, जि. सोलापूर), सागर अशोक गव्हाणे व दत्तात्रय विजय गिरे (रा. दाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर), आकाश नामदेव पवार (रा. वडजी तांडा, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.दुय्यम निरीक्षक गिरीषकुमार कर्चे यांनी दिलेल्या माहितीनुसार, विभागाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे माळेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत पाहुणेवाडी, ढवळेमळा आणि तुकाई माळ (माळेगाव खुर्द) येथे गावठी दारू विक्रीसाठी काही जण चारचाकी वाहनांतून येत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. ही कारवाई पुणे विभागाचे अधीक्षक अतुल कानडे, उपअधीक्षक उत्तम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक शहाजी शिर्के, दुय्यम निरीक्षक गिरीषकुमार कर्चे, तसेच सागर साबळे, मनोज होलम, निखिल देवडे, सुरेश खरात आणि सागर दुबळे यांच्या पथकाने केली.

# पुणे साखळी बॉम्बस्फोटातील आरोपीला हायकोर्टाकडून जामीन; १२ वर्षानंतर तुरुंगाबाहेर येणार फारुख बागवान

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे साखळी बॉम्बस्फोटांमधील आरोपीला १२ वर्षानंतर जामीन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे, आता आरोपी फारुख बागवानची लवकरच तुरुंगातून सुटका होईल. यापूर्वी, १९ जानेवारी २०२३ रोजी याच प्रकरणातील दुसरा आरोपी असलम शब्बीर शेख उर्फ बंटी जहागीरदारला मुंबई हायकोर्टाने जामीन मंजूर केला होता. २०१३ मध्ये जहागीरदारला अटक करण्यात आली होती. आता, २०१२ सालच्या साखळी स्फोट प्रकरणातील आरोपी फारुख बागवानला जामीन मंजूर करण्यात आला आहे. आरोपी हा खटल्याविना १२ वर्षे कारागृहात असल्याने न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. बागवान विरोधात या प्रकरणाव्यतिरिक्त इतर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचं कोर्टाने निकालात नमूद केलं आहे.

पुणे साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात जामीन मिळालेल्या अन्य आरोपींप्रमाणेच बागवानवर आरोप असून समानतेच्या आधारावर बागवानला देखील जमीन मिळण्याचा अधिकार असल्याच निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. खटला जलदगतीने निकाली निघण्याचा मूलभूत अधिकार प्रत्येक आरोपीला आहे. मात्र, बागवानविरुद्धचा खटला नजीकच्या काळात निकाली निघण्याची शक्यता दुर्मिळ असल्याचे निरीक्षणही मुंबई उच्च न्यायालयाने जामीन अर्जावरील सुनावणीवेळी नोंदवले आहे. त्यामुळे, आरोपी फारुख बागवानला मोठा दिलासा मिळाला आहे.

पुण्यातील जंगली महाराज रोडवर १ ऑगस्ट २०१२ रोजी पाच साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या स्फोटामध्ये एक जण जखमी झाला होता. डेक्कन परिसरातील सहा ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पाच बॉम्ब काही मिनिटांच्या अंतराने फुटले होते तर एक बॉम्ब फुटला नाही. दहशतवाद्यांकडून हे बॉम्ब तयार करण्यात त्रुटी राहिल्याने मोठी दुर्घटना टळली होती. मात्र, तेव्हा डेक्कन परिसरात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली. अनेकांना सुरुवातीला या स्फोटांचं गांभीर्य लक्षात आलं नाह. पण, काही मिनिटांतच काही अंतरावर ठेवण्यात आलेले पाच बॉम्ब सलग फुटल्याने मोठा दहशतवादी हल्ला असल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर पुण्यातील संपूर्ण यंत्रणा कामाला लागली. स्फोट न झालेला बॉम्बही निकामी करण्यात आला होता. डेक्कन परिसरातील पाच ठिकाणी हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. त्यातील पहिला बॉम्ब बालगंधर्व रंगमंदिराजवळ ठेवण्यात आला होता. त्यानंतर मॅकडोनाल्ड कॅफे, देना बँक, गरवारे पूल या ठिकाणीदेखील बॉम्ब ठेवण्यात आले होते. मात्र बॉम्ब बनवण्यात त्रुटी राहिल्याने पुण्यात मोठी जीवितहानी टळली होती.